REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2023

# ग्रामीण साहित्यातील शेतकरी जीवनाचे दर्शन

कविता किरण मोरे



ग्रामीण साहित्यातील संस्कृत 'ग्राम' या शब्दाचा अर्थ मराठीत गाव असा आहे. खेडणे म्हणजे मशागत करणे यावरून 'खेडेगाव' असा शब्द प्रचलित झाला. भारतासारख्या कृषीप्रधान देशात 'शेती' हा उत्पन्नाचा मुख्य घटक असल्याने तेथील लोक शेतीत काबाडकष्ट करून अन्नधान्य पिकवितात. प्रामुख्याने आपली वा दुसऱ्याच्या मालकीची जमिन कसून उदरनिर्वाह करतात. पूर्वी शेतकऱ्यांचे जीवन सुरळीत चालण्यासाठी १२ बलुतेदार, १८ अलुतेदार तसेच फिरस्ते, मागते-जोगते असे सर्व मिळून गावाची रचना पूर्ण होत असे. 'ग्राम' वरून ग्रामस्थ, ग्रामीण व ग्रामकन्या हे संस्कृत शब्द तर 'गाव' वरून गावठाण, गावकरी, गावकूस, गावरान, गावभवानी व गावगाडा असे अनेक शब्द मराठीत उपयोजिले जातात. यातील प्रत्येक शब्द गावाशी निगडित आहे. यावरून ग्रामजीवनात रूजलेल्या चालीरिती, सण-उत्सव, रूढी-परंपरा, श्रद्धा-अंधश्रद्धा व दैनंदिन कर्तव्यकर्मे यातून ग्रामसंस्कृतीची जडण घडण होत गेली.

ग्रामसंस्कृतीचा उदय आणि विकास कस-कसा झाला ते प्रा. भास्कर चंदनशिव यांनी पुढील शब्दात व्यक्त केले आहे. ''कृषि मूल हि जीवनम्' कृषी ही मानवीजीवन व्यवस्थेचा पाया आहे. धर्मग्रंथांनी आणि धार्मिक विचारवंतांनी 'भाकरीत परमेश्वर पाहिल्याचे दिसते' हिंदू धर्मात अन्न 'परब्रम्ह' म्हटलेले आहे. बायबलमध्ये भाकरीला 'गॉड' कुराणात 'अल्ला' म्हटलेले, या भाकरीच्या प्राप्तीसाठीच समाज घडतो आहे. इतिहासाचा प्रारंभच मुळी भाकरीसाठी, भाकरीतून भाकरीकडेच होत असल्याचे सांगितले जाते. ... उघड उघड लुटालुट करणारा इतिहासपूर्व काळ याला इतिहासाने टोळीयुग म्हणून संबोधलेले आहे.त्या-त्या टोळीयुगातून साकारणारी लुटमारीची प्रगत अवस्था म्हणजे जे ज्या टोळीच्या प्रमुखाने राजमुगुट धारण करून दरबार भरविला. सक्तीची वसुली, खंडणी, शेतसारा इ. असंख्य कारभार लादून राजेशाही आस्तित्वात आणली. त्या-त्या सक्तीच्या वसूलीसाठी आवश्यक असणारी प्रशासकीय यंत्रणा निर्माण झाली. सैन्याची बांधणी झाली. सालो साल बदलणाऱ्या महसुली आणि मान्सुन अस्मानीत टाचा घासणारा उत्पादक शेतकरी दास कसा बनला? गुलामगिरीत कसा ढकलला गेला? याची हृदयविदारक वर्णने म. ज्योतिबांनी आपल्या ग्रंथातून मांडलेली आहेत''[१] यामधून काळाच्या ओघात शेतकऱ्याची दूरवस्था कशी होत गेली याचा अंदाज येतो.

पूर्वीच्या काळी शेती ही उच्चप्रतीची, व्यापार हा मध्यम प्रतीचा, नोकरी ही कनिष्ठ प्रतीची समजली जात होती. परंतु शेतीतील लाभ वा हानी ही निसर्गाच्या त्यातही पावसाच्या लहरीवर अवलंबून असल्याने जरी शेती करण्याच्या तंत्रात कालमानानुसार नवनव्या सुधारणा होत गेल्या, तऱ्हेतऱ्हेच्या वाणाचे बी-वियाणे अस्तित्वात आले. प्रगत औजारे व औषधे यांचे शोध लागले तरी शेतकऱ्यांचे उत्पन्न बेभरवशाचे व पोटापुरते राहिले. यात तिळमात्र शंका नाही.

भारत हा कृषीप्रधान देश आहे असे वारंवार म्हटले तरी आज शेती व शेतकरी हा आजही प्रतिष्ठाप्राप्त व्यवसाय विशेषतः शहरी भागात व सुशिक्षित मध्यमवर्गीय किंवा उच्च मध्यमवर्गीय स्तरांमध्ये मानला जात नाही. याची जाणीव म. फुले यांना होती. म्हणूनच त्यांनी प्रस्थापित समाजरचनेवर शेतकऱ्यांचा आसूड उगारला. शतकानुशतके चालत आलेल्या गुलामगिरीवर

प्रहार करून सर्वसामान्य जनतेला व राज्यकर्त्यांना त्यांनी खडबडून जागे केले. म. फुले, म. गांधी, डॉ. आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज व कर्मवीर भाऊराव पाटील या समाज सुधारकांनी 'शेतकरी' या समाजघटकाकडे समाजाचे लक्ष वेधले. भारत कृषीप्रधान देश असल्याने येथील समृद्धी व भरभराट शेतकऱ्यावरच अवलंबून आहे याची जाणीव त्यांनी करून दिली. शिक्षणाशिवाय या कष्टकरी ग्रामीण समाजात आवश्यक तो बदल होणार नाही. शिक्षणाअभावी समाजाची कशी अवनती झाली आहे याचे वर्णन ते 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात पुढील प्रमाणे करतात.

''विद्येविना मती गेली, मती विना नीती गेली
नीती विना गती गेली, गती विना वित्त गेले
वित्ता विना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले''[२]

अगदी मोजक्या शब्दात म.फुले यांनी मानवी जीवनातील शिक्षणाची महती व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी म. फुले यांनी सरकारला वेळोवेळी सूचना केल्या होत्या. त्यामध्ये तलाव, धरणे, बंधारे व विहिरी बांधून यांद्वारे शेतीला पाणीपुरवठा करावा. पिकांच्या संरक्षणासाठी शेतकऱ्यांना बंदुकीचे परवाने द्यावेत, कालव्याचे पाणी वेळेवर मिळावे, शेतीवर वाजवी कर आकारावा, शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करून त्यांना जोडधंदा म्हणून पशुपालन तसेच शेतीची माहिती देणाऱ्या पुस्तिका छापाव्यात, शेती करण्याची पद्धत व औजारे यामध्ये सुधारणा करावी आणि शेतकऱ्यांना कमी व्याज दराने कर्जे उपलब्ध करून द्यावीत अशा अनेक शिफारशींचा समावेश होता.

१९२० नंतर सर्व राजकीय सूत्रे म. गांधीजींच्या हाती आल्याने त्यांनी 'ग्रामस्वराज्य' या स्वतंत्र ग्रंथाची निर्मिती केली. शेतकऱ्यांच्या जीवनातील दुःखाला, दारिद्र्याला व अन्यायाला वाचा फोडून ग्रामोद्योग सुरू केला. 'खेड्याकडे चला', 'स्वदेशीचा वापर' (खादी वापरा) व 'परदेशी मालावर बहिष्कार' यातून देशाची प्रगती होऊन देशातील अनेक प्रश्न सुटतील असे म. गांधीजींचे विचार होते.

डॉ. आंबेडकरांनी जनतेला 'शहराकडे चला' असा उपदेश केलेला असला तरी त्यांच्या मते खेड्यात जातीव्यवस्था बळकट असते. खेड्यात लोकांना काम मिळत नाही. शहरात गेल्यावर त्यांच्या रोजी रोटीचा प्रश्न मिटेल. संसदेतील घटनेत मजूर पक्षाचे प्रश्न मांडून घटनेत त्यांना अधिकार मिळवून देण्यासाठी 'स्वतंत्र मजूर पक्षाची' स्थापना केली. 'शिका, संघर्ष करा व संघटित व्हा' असा मोलाचा संदेश त्यांनी जनतेला दिला. या थोर विचारवंतांच्या विचाराचे पडसाद मेधा पाटकर यांच्या 'नर्मदा बचाव आंदोलना' प्रसंगी पडलेले दिसतात. मोठी धरणे बांधून शहरांना जो पाणीपुरवठा केला जातो. त्यातून पाण्याचा अपव्यय होतो.म्हणून तसे न करता शेतकरी जीवनातील पाण्याचे व वीजेचे प्रश्न सोडवणे हितावह आहे.

ग्रामसंस्कृतीत शेतकऱ्याला ग्रामीण जीवनाचा कणा म्हणून संबोधले आहे. ग्रामजीवनाचा तो मध्यवर्ती स्त्रोत आहे.शेतीच्या उत्पन्नावर तो जगतो व इतरांना जगवितो. गावगाडा पद्धतीत गावातील पाटील-कुलकर्णी यांच्याकडे त्या गावाची वतनदारी दिलेली असते. इतर बलुतेदार, अलुतेदार, फिरस्ते, मागते व जोगते यांचाही खेडेगावात सहभाग असतो. ग्रामसंस्कृती म्हणजे खेडेगावातील शेतकरी लोकांचे आचार विचार, पेहराव, भाषा, रूढी-परंपरा, चाली-रिती, देवदेवता व सण-उत्सव इ. गोष्टींना सामावून घेऊन जगण्याची पद्धत होय. ग्रामसंस्कृतीतून ग्रामीण जीवनाचा व ग्रामजीवनातून ग्रामीण साहित्याचा उदय होत असल्याने 'ग्रामसंस्कृती' हा ग्रामीण साहित्याचा मुख्य घटक आहे. ग्रामसंस्कृती कृषीकेंद्रीत असल्याने 'शेतकरी' हा ग्रामीण जीवनाचा कणा आहे. ग्रामसंस्कृतीमध्ये शेतकऱ्याचे अन्न (जोंधळ्याची भाकर व हिरव्या मिरचीचा ठेचा), पोषाख (धोतर, शर्ट, पांढरी टोपी किंवा पटका व कष्ट करताना डोक्याला टॉवेल गुंडाळलेला), कपाळाला अष्टगंध किंवा बुक्का, घरे (छपराची, पत्र्यांची किंवा खोपी), भाषा (ग्रामीण बोली), म्हसोबा, मरीआई सारख्या ग्रामदेव-देवता, भुते-खेते, बैलपोळा (बेंदूर) व दिवाळी सारखे सण-उत्सव आणि यात्रा अशा अनेक रूढी-परंपरांचा व अंधश्रद्धांचा अंतर्भाव ग्रामसंस्कृतीमध्ये होतो.

ग्रामसंस्कृतीत आणखी एक घटक महत्वाचा असतो. तो म्हणजे शेतकऱ्याशी संबंधित प्राणी होत. गाय, म्हैस, शेळी, घोडा, कुत्रा, मांजर व कोंबड्या या गुरा-ढोरांशी शेतकऱ्यांचे भावबंध गुंतलेले असतात. कारण त्यांच्या जीवनाचा आधारच या गुरांशी संबंधित असतो. पूर्वी केली जाणारी शेती व तदनुषंगिक उत्पन्न गुरांची स्थिती चांगली व धष्टपुष्ट असण्यावर विशेषतः अवलंबून असल्याने जसे हे भावबंध उत्पन्न होतात तसे ते वर्षानुवर्षे एकत्र नांदण्यातूनही जोपासले जातात. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याचे आपल्या गुरांवर अपत्यावत प्रेम असते. होता होईतो कितीही अनावस्था प्रसंग त्याच्यावर आला तरी तो सहसा गुरांची विक्री करून पैसे कमविण्यास राजी होत नाही.

शेती (काळी माय/जमीन/वावर) हाच इथल्या जनमानसाचा जगण्याचा मुख्य आधार होय. त्याचे वर्णन डॉ. आनंद यादव यांनी पुढीलप्रमाणे केले आहे. ''शेतकऱ्याची मुलं-मुली मातीत उगवल्यासारखी वाटतात. त्यांचा संबंध सतत मातीशी असतो. ती सतत मातीशी खेळतात. मातीची भांडी करून ती संसार करतात. मातीचे बैल करून, तुरकाट्याची मोटवण करून,

गणकाट्याची गाडी किंवा औत करून ती खेळत असतात. मातीतच त्यांना काम करावे लागत असल्याने त्यांचे चेहरे, त्यांची अंग रापून गेलेली असतात. त्यामुळे त्यांचे देहही दगडा धोंड्याचे किंवा मातीचेच केल्यासारखे दिसतात. मातीतून उगवल्या सारख्या दिसणाऱ्या या मुलांच्या बाबतीत

माती असशी, मातीत जगशी तुझी रे माता माती। माती होऊनी,
मातीत जाशी तरी तुला प्रिय माती।।

हे माती चित्र खरे वाटते''[३] म्हणूनच मातीला दिलेली 'काळीमाय' ही उपमा यथार्थ वाटते. 'शेती' हेच उत्पन्नाचे मुख्य साधन असल्याने कोणत्याही शेतकऱ्याला मातीत घाम गाळल्याशिवाय, प्रत्यक्ष राबल्याशिवाय आणि वेळच्या वेळी आवश्यक ती कामे उरकल्याशिवाय पिक दिसत नाही. त्यामुळे स्वाभाविकच शारिरीक श्रम हे प्रत्येकाला करावेच लागतात त्याविना गत्यंतर नसते. तसेच शेतीसंबंधी कामे अनेकांच्या सहकार्याने करावी लागतात. त्यामुळे 'समूहभाव' हा ग्रामसंस्कृतीतील जगण्याचा स्थायिभाव बनतो. खेड्यातील कोणतीही व्यक्ती एकटेपणाने जगू शकत नाही ती घराशी, गोतावळ्याशी, समाजाशी, गावाशी व पंचक्रोशीशी बांधली गेलेली असते.येथे व्यक्तिगत असे काहीच नसते.जे असते ते साऱ्या गावाचे, घराचे व गोतावळ्याचे असते.चांगली किंवा वाईट गोष्ट ही देखील सर्वांची असते.उदा. अमक्या गावचा पैलवान, तमक्या गावचा चोर अशा प्रकारे गावाचा त्या व्यक्तीशी संबंध असतो. प्राणी-पशू-पक्षी व कृमी-कीटक यांच्या सहीत निसर्ग व निसर्गातील छोटा मोठा जीव ग्रामसंस्कृतीचा घटक असतो. 'दिल्याने वाढते' औदार्यामागील धारणा ग्रामसंस्कृतीत आढळते. जे असेल ते एकमेकांत वाटून जगण्याची तयारी असल्याने आपल्याला कमी पडले तरी चालेल पण समोरचा तृप्त होणे महत्वाचे असते. गुऱ्हाळ चालू असताना वाटसरूला पेलाभर रस तसेच गुळाची शेरणी हातावर ठेवली जाते. दिल्याने बरकत येते. म्हणून चूल पेटविल्यावर चहाचा पहिला थेंब अग्नीला देण्याची पद्धत ग्रामजीवनात रूढ होती. स्वार्थाला ग्रामसंस्कृतीत स्थान नसते. वयोवृद्ध शेतकऱ्यांचा तर स्वतःच्या व कुटुंबाच्या जीवापेक्षा शेती व जनावरे यावर अधिक जीव असतो. निसर्गातील प्रत्येक जीव जगला पाहिजे. तो जगविण्यासाठी प्रसंगी जीवाचे रान करण्यासही शेतकरी मागे-पुढे पाहात नाही. प्रत्येक जीवावर त्याचे अतोनात प्रेम असल्याने त्याच्या केसाला धक्का लागणे म्हणजे जणू आपल्यावर संकटआल्यासारखे शेतकऱ्याला वाटते. मौखिक परंपरेला ग्रामजीवनात महत्वपूर्ण स्थान असल्याने कोणत्याही पद्धतीच्या लिखापढीपेक्षा दोन किंवा त्यापेक्षा अधिक माणसांमधील व्यवहारात दिलेला शब्द प्रमाण मानला जातो. त्यावर विश्वास ठेवून व्यवहार होतात. या विश्वासाला कोणत्याही कारणाने तडा गेला तर त्या शेतकऱ्याचे संपूर्ण कुटुंबच कलंकित मानले जाते. त्यामुळे 'पाचामुखी परमेश्वर' हा न्याय येथे मानला जातो. गावातील पाच लोक जे काही सांगतील ते असत्य, खोटे व चुकीचे असणारच नाही. अशी श्रद्धा प्रबळ असते. अशा साऱ्या घटकांनी ग्रामसंस्कृतीला आकार दिलेला दिसतो. त्याचेच कमी-अधिक प्रमाणात प्रतिबिंब ज्या प्रकारच्या साहित्यात उमटलेले दिसते त्याला स्थूलमानाने 'ग्रामीण साहित्य' असे संबोधले जाते.

## निसर्ग –

निसर्ग हा ग्रामजीवनाचा आत्मा आहे.डॉ.सुहास पुजारी यांनी म्हटल्याप्रमाणे ''हा निसर्गच ग्रामीण जीवनाला आकार देत असतो. त्याला रंग रूप देत असतो.तेथील वृत्ती-प्रवृत्ती घडवत असतो. त्या जीवनाचे पोषण आणि शोषण करीत असतो. अनागर जीवनाला व्यापून राहिलेला असल्याने त्याच्या या सर्व व्यापकतेमुळे ग्रामीण साहित्यातही तो अनेकांगांनी प्रकटला आहे''[४] ते यथार्थ आहे.

गो. नि. दांडेकरकृत 'माचीवरला बुधा' व व्यंकटेश माडगूळकर लिखित 'बनगरवाडी', शंकर पाटील यांची 'टारफुला' या कादंबऱ्यांमध्ये निसर्गाला जणू एक मानवी व्यक्तिमत्वच प्राप्त होते.

## प्राणी-पशुपक्षी सृष्टी –

खेडेगावात बैल का दिसतो? कारण बैल हा प्राणी कृषी संस्कृतीचा मुख्य घटक आहे. बैल, गाय, म्हैस, शेळी, मेंढ्या, घोडा, कृत्रा, मांजर हे प्राणी तर कावळा, चिमणी, पोपट, घार, कोंबडा, घुबड, कोकीळा, सुतारपक्षी, बगळा व बदक हे पक्षी ग्रामीण भागात आढळतात. माणसापेक्षा जनावर श्रेष्ठ ते जेथे जन्मतात तेथेच मरतात. शेतकऱ्यांचा मृत्यू झाला तर त्याचा गोतावळा आक्रंदन करतो. पाळीव प्राण्यांनाही भावना असतात.

### अन्नपदार्थ –

पूर्वी पाच महिन्याचे जोंधळ्याचे पीक पोषक व सकस असल्याचे प्रचलित होते. जोंधळ्याची भाकर, झुणका व हिरव्या मिरच्यांचा ठेचा त्याच्या जोडीला पापड व छोट्या कोवळ्या मिरच्या हे शेतकऱ्यांचे रोजचे अन्न होते. त्यावेळी दूध, दही, ताक, लोणी व तूप यांची सुपिकता होती.

### चाली रिती आणि सण उत्सव

ग्रामीण माणूस धर्मभोळा असल्याने तो भीतीपोटी पृथ्वी, आप, तेज, वायू व पाणी या पंचमहाभूतांना देवता मानून त्यांची पूजा करतो. वर्षातील बारा महिन्यांमध्ये येणाऱ्या काही सणांना व उत्सवांना शेतकऱ्यांच्या जीवनात अत्यंत महत्वाचे स्थान असते. चैत्र पाडवा (गुढीपाडवा), बेंदूर (बैलपोळा), नागपंचमी, रक्षाबंधन, गणेशोत्सव, विजयादशमी (दसरा), दिवाळी, संक्रांत, महाशिवरात्री व होळी इ. सण उत्सव गावकरी उत्साहाने साजरे करतात. गुढी पाडव्याला लिंबाच्या पाल्याची पूजा, बैलपोळ्याला बैलांची पूजा, नागपंचमीला नागोबाची पूजा, गणेशोत्सवामध्ये गणपतीला प्रार्थना, दसऱ्याला मातीची पूजा, खंडीपूजा म्हणून इतर शेतीच्या अवजारांची पूजा, आनंद व्यक्त करण्यासाठी दिवाळी साजरी करतात. होळीला अग्नीची पूजा करतात.

### यात्रा–जत्रा (उरुस)–

शेतीची कामे संपल्यावर पिक घरी येऊन पडले की ग्रामदेवतांची यात्रा असते. मार्गषीर्ष महिन्यापासून ते चैत्र पौर्णिमे पर्यंत सर्व गावच्या यात्रा भरविल्या जातात. यात्रे मध्ये शर्यती वगैरे घेतल्या जातात.

### श्रद्धा/अंधश्रद्धा –

रात्रीच्या वेळी टिटवी ओरडली की गरोदरबाई बाळंतीण होते. तसेच नुकत्याच जन्मलेल्या बाळाच्या पाचव्या दिवशी सटवाई त्याचे भविष्य त्याच्या कपाळावर लिहिते. घरासमोर कावळा ओरडला की पाहुणे येण्याची शक्यता असते. साप चावून माणूस मेला की तो राजाच्या पोटी जन्माला जातो.

### दैनंदिन जीवनक्रम –

पहाटे तांबडे फुटताच शेतकरी उठतो. उठल्यावर आपले देहधर्म आटपून गुरा ढोरांना चारा घालून त्यांच्या क्रिया उरकून तो बैलगाडीने किंवा सधन असल्यास आता दुचाकीवरून शेतात जाण्यास निघतो. पेरलेल्या बियाणांचे निरीक्षण करून तो खुरपणी, भांगलन, गुरांना चारा काढणे, विहिरीचे पाणी उपसून ते पिकांना घालणे आवश्यकता असेल त्याप्रमाणे युरिया वैगेरे रासायनिक खतांची फवारणी करणे तसेच पीक आले असेल तर पशु पक्षांपासून त्यांचे संरक्षण करणे. तसेच कापणी, मळणी अशा अनेक लहान मोठी व विविध प्रकारची कामे शेतकऱ्याला गरजेनुसार करावी लागतात शेतकरी शेती करतो म्हणून अन्नपदार्थ मिळतात. हे ध्यानात घेतले तर विश्वाचा पोशिंदा असे जे शेतकऱ्याला संबोधले जाते ते सार्थ आहे असे म्हणावे लागेल.

### बोलीभाषा –

ग्रामीण साहित्यातून ग्रामीण जनतेच्या सुख–दुःखाचे, आशा–आकांक्षांचे आणि व्यथा वेदनांचे चित्रण होत असल्याने, लेखक त्यांची अभिव्यक्ती करण्यासाठी प्राधान्याने बोलीभाषेचा अवलंब करतो. तरच त्याने केलेले चित्रण वाचकाला सहज व स्वाभाविक वाटते. त्यामुळे बोलीभाषेला महत्वाचे स्थान आहे.

### ग्रामव्यवस्था –

गावाचा कारभार सुरळीत चालावा म्हणून ग्रामपंचायत असते.रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण व आरोग्य अशा पायाभूत क्षेत्रांमध्ये लोकांना उत्पन्न निर्माण करून देण्याचे कार्य ग्रामपंचायती मार्फत व्हावे अशी अपेक्षा असते. सरपंच, उपसरपंच, पोलिसपाटील, तलाठी व अन्य सदस्य मिळून हे काम करतात. गावातील जनता निवडणूकीच्या मार्गाने सरपंचाची व उपसरपंचाची निवड करते.गावाचा कारभार त्यांनी व्यवस्थित चालवावा अशी अपेक्षा असते. ७/१२ उताऱ्यावरून जमिन कोणाची ते कळते. तलाठ्याची चावडी हे ग्रामस्तरावरील महसुली कार्यालय होय.

अशा या व्यापक साहित्याचे साहित्यिक म्हणून ह. ना. आपटे, श्री. म. माटे, शंकर पाटील, अण्णा भाऊ साठे, आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले, भास्कर चंदनशिव, रा. रं. बोराडे, सदानंद देशमुख, केशव देशमुख, जयंत पवार, नीरजा, बहिणाबाई चौधरी इ. अनेक साहित्यिक ग्रामीण आशा–आकांक्षा मांडण्यास हिरीरीने पुढे आले आहेत.

अशा या जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी दारिद्र्याने खिदपत पडला आहे. स्वतः अन्न पिकवले तरी चांगले अन्न दुसऱ्याला देऊन उरलेले अन्न तो खातो. स्वतः कापूस पिकवितो. नोकरदार, व्यापारी यांना गादीवर झोपण्याची व्यवस्था करतो व स्वतः चिंध्यांच्या गोधडीत (वाकळेत) झोपतो. शेतीसाठी कर्जे काढून शेवटी ते फिटत नाही म्हणून आत्महत्या करतो म्हणजेच बळी जातो. या बळीराजाला न्याय मिळणार कधी? याचे दारिद्र्य संपणार कधी? असे अनेक प्रश्न उभे राहतात. ते ग्रामीण साहित्यातून समाजापर्यंत पोहचत आहेत. ही खरोखरच आनंदाची गोष्ट म्हणावी लागेल.

### संदर्भ ग्रंथसूची –


१) कुलकर्णी गो. म. (संपा.) 'अभिरूचीः ग्रामीण व नागर' अ.भा.म.सा.सं.कऱ्हाड, १९७६.
२) कुलकर्णी मदन 'कादंबरी मराठी प्रादेशिकः तंत्र आणि स्वरूप', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९८४.
३) कुलकर्णी मदन 'साहित्य ग्रामीण आणि दलित' विजय प्रकाशन, नागपूर, २००२.
४) खोले विलास (संपा.) 'गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी', लोकवाङ्मयगृह, मुंबई, दुसरी आवृत्ती २००७.
५) गाडगीळ गंगाधर 'खडक आणि पाणी' पॉप्युलर प्रकाशन मुंबई प. आ. १९६०.
६) ठाकूर रविंद्र 'मराठी ग्रामीण कादंबरी' आम्रपाली, रंकाळा पार्क, कोल्हापूर १९९३.
७) जाधव रा. ग. 'कला साहित्य आणि सामाजिक संदर्भ' कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे १९७५.
८) नलगे चंद्रकुमार 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास', सुरेश एजन्सी प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, २००६.
९) बोराडे रा. रं. 'ग्रामीण सहित्यः चळवळ आणि निर्मिती' संस्कृती प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, पुणे २०१०
१०) भोसले द. ता. 'ग्रामीण साहित्यः एक चिंतन' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८८.
११) यादव आनंद 'ग्रामीण साहित्यः स्वरूप अणि समस्या' मेहता प्रकाशन, पुणे, १९७९.
१२) यादव आनंद, 'ग्रामीण साहित्य – दिशा आणि अपेक्षा' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९७९.